आज सकाळी मंदिरात तडा भरण्यात



# शासकीय तंत्रनिकेतनमार्फत 'स्कूल कनेक्ट' उपक्रम

**चाळीसगांव** ✍ प्रतिनिधी

उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, तंत्र शिक्षण संचानालय, मुंबई व महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुबंई यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यात 'स्कुल कनेक्ट ' हा उपक्रम राबविण्यात येत आहे. तंत्रशिक्षणाचा प्रचार, प्रसार व व्हावा विद्यार्थ्यांना पदविका अभ्यासक्रमाची विस्तृत माहिती मिळावी हा उद्देश समोर ठेऊन जळगांव जिल्ह्यातील शाळांमध्ये हा उपक्रम राबविण्यासाठी शासकीय तंत्रनिकेतन, जळगांवची निवड करण्यात आली आहे. सदर उपक्रम राबविण्यासाठी संस्थेमार्फत मार्फत नुकतीच चाळीसगांव येथे गट विकास अधिकारी श्री व्ही ए भोई ह्यांच्या मार्गदर्शनाखाली विविध शाळांच्या मुख्याध्यापकासमवेत सभा घेण्यात आली. सभेला चाळीसगांव तालुक्यातील ४५ शाळांचे मुख्याध्यापक उपस्थित होते. सर्व मुख्याध्यापकांनी त्यांच्या शाळेत हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी कसा राबवता येईल. ह्या करता चर्चा करण्यात आली.

जळगाव तरुण भारत

**Main Edition | 2019-06-19 | Page- 3**

# शासकीय तंत्रनिकेतनच्या 'करिअर फेअर'मध्ये विद्यार्थ्यांना लाभले तंत्र शिक्षणाचे मार्गदर्शन

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १८ जून**

येथील शासकीय तंत्रनिकेतनमध्ये 'करिअर फेअर' कार्यक्रमात विद्यार्थ्यांच्या तंत्र कौशल्याचे उत्स्फूर्त दर्शन घडले. यावेळी इयत्ता दहावी, बारावी व आयटीआय उत्तीर्ण विद्यार्थ्यांची मोठी उपस्थिती होती.

करिअरच्या महत्वाच्या वळणावर असलेल्या विद्यार्थ्यांना योग्य दिशा मिळावी व तंत्रशिक्षणाचे सखोल मार्गदर्शन मिळावे या उद्देशाने कार्यक्रमाचे आयोजन तंत्रशिक्षण संचालनालय व महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांच्यावतीने केले होते. प्रमुख अतिथी म्हणून जि.प.चे शिक्षण सभापती पोपटतात्या भोळे, अहमदनगर येथील शासकीय तंत्रनिकेतनचे प्राचार्य एम. एस. सातारकर व एमएसईबीचे उपव्यवस्थापक व अभियंता सुलेमान तडवी उपस्थित होते. व्यासपीठावर शासकीय तंत्रनिकेतनचे प्राचार्य डॉ. एम. व्ही. इंगळे, प्रा.आर.डी.पाध्ये, प्रा. डॉ. एस. बी. वेस्ली, प्रा. डॉ. पी. पी. चौधरी, प्रा. डॉ. रामेथ डायस, डॉ. एस. डी. पाटील, प्रा. ए. एस. झोपे. प्रा. के. पी. अकोले व प्रा.सी.पी.भोळे उपस्थित होते.

प्रास्ताविक प्रा. के. पी. वानखेडे यांनी तर पाहुण्यांचा परिचय प्रा. एस. आर. लांडगे यांनी करून दिला. पोपटतात्या भोळे यांच्याहस्ते मान्यवरांच्या उपस्थितीत दीपप्रज्ज्वलनाने कार्यक्रमाचे उद्‌घाटन झाले.

पोपट भोळे यांनी मनोगतात प्रत्येक विद्यार्थी हुशार असतो, मात्र त्याने त्याचा अभ्यासक्रम आवडीने निवडला तर त्यात तो निश्चितच यशस्वी होत असल्याचे दाखवून दिले. सुलेमान तडवी यांनी पालकांनी मुलांना त्यांचे करिअर निवडण्याचे स्वातंत्र्य देणे व त्यांच्यावर आपली मते न लादण्यावर भर दिला. प्राचार्य एम. एस. सातारकर यांनी शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी टोटल क्वालिटी मॅनिजमेंटप्रमाणे टोटल पर्सनॅलिटी डेव्हलपमेंटकडेही आवर्जून लक्ष देण्याचे आवाहन केले. प्राचार्य डॉ. एम. व्ही. इंगळे यांनी पदविका अभ्यासक्रमाचे फायदे, त्यातील उपलब्ध असलेल्या रोजगाराच्या संधींवर मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी विविध विभागांना भेटी देऊन प्रयोगशाळा, उपलब्ध उपकरणे व विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या विविध प्रोजेक्ट्सची माहिती जाणून घेतली. आभार प्रदर्शन प्रा. डॉ. पी. पी. चौधरी यांनी केले, यशस्वीतेसाठी सर्व प्राध्यापक, अधिकारी व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.